एकांगी

अजुनही तू तशीच
जेंव्हा तुला पहिल्यांदा होत पाहील
त्या पहिल्यावहील्या क्षणात
ह्रुदय तुझ्या चरणी होत वाहील

अजुन तु तशीच
डोळ्यांच्या कोनातून बघणारी
अजुनही तू तशीच
नजर चुकवत बोलणारी

अजुनही आठवत तुझ
ओठ दाबुन हसण
अजुनही आठवत तुझ
शृंगाराविना सजण

तुझं अंगठ्यानी जमिन उकरण
माझ्या मनात खोलवर रुतलय
त्या क्षणात पेरल्या बिजाच
आज एक छानस रोपट बनलय

त्या सर्व आठवणींचा सुगंध
मनात दरवळत रहातो
त्या चित्रासम आठवणींना
मी तासंतास निहाळत रहातो

डोळे मिटुन ऐकताना
एखादं रोमँटीक गाण
मग दबक्या पावलाने तुझ
बंद पापण्यांमध्ये येण

स्वप्न नाहीत ती माझी
त्या तुझ्या आठवणी आहेत
माझ्या ह्या एकांत जगण्याला
त्याच खत पाणी आहेत

मीही जपुन ठेवलय
माझं एकांगी चकोरपण
चंद्र पाहताना प्रत्येकवेळी
येतेच तुझी आठवण

प्रेमाच्या गंधावर जगणारा मी
मला मकरंदाची आस नाही
तू माझी व्हावीस असा
मज क्षणभरही भास नाही

कधीच लांघल्या सीमा
मी परकेपणाच्या
माझ्याच मी जपल्या प्रतिमा
आपल्या आपुलेपणाच्या

माझी स्वप्न, माझ्या आठवणी
तुला कधीच कळणार नाहीत
माझी पावल तुझ्या दिशेने
कधीच वळणार नाहीत.

सत्यजित.

उत्तर नसत प्रत्येक प्रश्नाला !!!!!!!

हेच आहे का प्रेम,
विचार तुझ्याच मना,
नात नाही कोणतच
तरी का हा आपलेपणा ?

प्रश्न दोघानाही सारखाच,
उत्तर दोघानाही हवे,
तुच सान्ग का एकमेकान्चि
सोबत दोघानाही भावे ?

मी ही विचारते आहे,
हेच माझ्या मना,
एकमेकान्विना करमत नाही
का असा हा वेडेपणा ?

उत्तर नसत प्रत्येक प्रश्नाला,
हेच असावे खरे,
नाही तर मिठीत येउनही तुझा
प्रश्न पुन्हा हाच का बरे ??????

-Amruta.

प्रेमाचे दोन क्षण

माझ्या प्रेमाचं आवरण
आजही तुझ्याभोवती असतं
तर ईतरांच्या नजरेतलं वादळ
तुझ्यापर्यंत कधिच आलं नसतं
हे जरी खरं नसलं
तरी चुकिचंही नाही
शेवटी तुझं आयुष्य तुझं आहे
माझं नाही
पण प्रेमाचे दोन क्षण
तुझ्या आयुष्यातले
जे तु मला दिले होतेस
ते मात्र हेरवुन घेऊ नकोस
माझ्या जगण्याचं कारण तु आहेस
माझ्या मरण्याचं करण तु होऊ नकोस

....विभा

अतुट बन्धन !!!!

प्रेमाच्या अतुट बन्धनासाठी
प्रत्येक बन्ध झिडकारले,
हसत सामोरी गेली दुखाना
तुझ्यासाठी मी कणकण जळले.

पण कधी जगायचे मला
कळलेच नाही माझ्यासाठी,
जीवनात येणारे प्रत्येक पाउल
उचलले केवळ तुझ्याचसाठी.

काट्याना करुन जवळ
फुलानाही दुर लोटले,
काट्यानी घायाळ होत गेली
तरिही तुझ्यावरच मी प्रेम केले.

काट्यानी दिलेल्या जखमा
कधी जाणवल्याच नाहीत मला,
कारण तु दिलेले काटेही
मी फुलागत झेलले !!!!

-Amruta.

तुझ्याचसाठी

सारिपाट ताऱ्यांचा साऱ्या
मांडुन बसलो आहे राणी
तुझ्याचसाठी

क्षितिजावरती अंतरातले
रंग उधळले आहेत सारे
तुझ्याचसाठी

अंगणात मी बरसत आहे
सात सुरांच्या होउन धारा
तुझ्याचसाठी

तेजब्रम्ह होउन कडाडे
अंबरातली वीज सुरांची
तुझ्याचसाठी

चहुदिशांना दरवळणारा
सुगंध माझ्या अस्तित्वाचा
तुझ्याचसाठी

प्रसाद

कोसळ...

आभाळ भरून दाटून येउन
जे बेभान होउन कोसळतं
असं सगळंच मला आवडतं
मग तो पाउस असो
किंवा चांदणं

आणि म्हणूनच तूही मला आवडतेस
कारण तूही दाटून येतेस
माझ्या इच्छांच्या अनंत आभाळात
आणि कोसळत रहातेस
तुझ्या अस्तित्वाचा कण अन कण घेउन
माझ्या अस्तित्वावर

पाउस असो
चांदणं असो
किंवा तू

तुम्ही कोसळत रहाता...
मी भिजत रहातो...
आणि हे चालूच रहातं
प्रत्येक क्षणी...
मी कुठेही असलो तरी!

प्रसाद

## केव्हा...?

बीजानं रुजायचं केव्हां?
फुलानं फुलायचं केव्हां?
त्यांच त्यांना वाटेल तेव्हां...

रातराणीनं बहरायचं केव्हां?
चांदण्यानं बरसायचं केव्हां?
त्यांच त्यांना वाटेल तेव्हां...

प्रेमात फुलायचं केव्हां?
प्रेमात झुलायच केव्हां?
आपलं आपल्याला वाटेल तेव्हां
आपलं आपल्याला वाटेल तेव्हां...

क्षिप्रा

## मिणमिणती भेट

मिणमिणत्या उजेडात
त्या दोघांच्या नजरा
एकमेकांशी बोलत होत्या
क्वचित कुठेतरी
पापण्यांची अलगद हलचाल व्हायची
एक विषय संपल्याची खुणच जणू
हलकेच कधी तिचा हात
त्याच्या हातामागे लपायचा
अन गुलमोहरासारखा शहारा
तिच्या सर्वांगावर फुलायचा
तिच्या सळसळत्या केसात
तो नेहमीच गुंतायचा
मग दिवस आहे कि रात्र

हेच विसरुन जायचा
ती आवरायची अन सावरायची
एक मर्यादा जपायला
पण मिणमिणत्या उजेडात
तो नेहमीच हाताबाहेर जायचा!!

....विभा

गुणगुणारा चंद्र

सहज चौकशीची
तुझी दोन चार पत्रे आली
माझ्या मनाची फांदी
हिरवीगार पाने ल्याली

तितक्याच सहजतेने
मीही तुला उत्तर दिले
उतरले देखील असतील
डोळ्यात तुझ्या मोर निळे

एवढ्यावर दोघांचा
पत्रव्यवहार ठप्प झाला
मनात गुणगुणारा चंद्र
कसा कोण जाणे गप्प झाला

क्षिप्रा

----- निशिगंध

सांग सखे गं , कसा तुला विसरू,
ते मेघ पुन्हा आले बघ ,
झाल्या श्रावणधारा सुरू.

ती ओघळली बघ वेलीवरची फुले,
पाण्यावरती पुन्हा जीव थरथरे.

थेंबात लोंबती पाने चहूकडे ,
गगनात रंगले तुझ्या स्मृतिंचे सडे.

गंध मातीचा, अंगांग शहारून जाई,
तो स्पर्श तुझा रंध्रात भरूनी राही.

मी उभा तसाच, चिंब भिजलेला,
हा हात तुझा हातात, नसलेला.

कातरवेळी झालो मी बेबंध ,
स्मरणात माझ्या , रूजला तुझा निशिगंध.

पद्मा

कसा सखे वद तुज विसरू
आले बघ ते मेघ पुन्हा अन
श्रावणधारा होती सुरू

फूल ओघळे वेलीवरती
जीव थरथरे पाण्या वरती
कसे सखे मगं मन आवरू

पर्ण डोलती थेंबा तोलत
स्मृती सड्यांनी गगनही रंगत
उधळण मी ती कशी न स्मरू

मृद्‌गंधानी अंग शहारे
रन्ध्रां तून तो स्पर्श पुकारे
सोडुन सईना परत फिरू?

चिम्ब भिजूनी दंग मी असा
हात तुझा हाती न कसा?
विरहाश्रू मी कसे सावरू

बेबंध असा मी कातरवेळी
स्मरूनी ती निशिगन्ध कळी
स्मृतीत रुजत्या निशिगन्धाचा
कसा सखे वद घात करू

निशब्द